# Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक ३०/०५/२०२५

## नागपुर ग्रामीण जिल्हयात सुरू करण्यात येत आहे आंतरराज्य आणि आंतरजिल्हा सीमा तपासणी नाके.

आगामी बकरी ईद सणोत्सव असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पासुन आंतरराज्य आणि आंतरजिल्हा सीमा तपासणी नाके सुरू करण्यात येणार आहे. सणोत्सवादरम्यान असामाजिक तत्वे व गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या लोकांकडुन अवैध रित्या जनावरे ,शस्त्र, दारू, स्फोटके, अंमली पदार्थ इत्यादीची साठा करून वाहतुक केली जाते. नागपुर ग्रामीण जिल्हयाची हद्द मध्यप्रदेश राज्य तसेच भंडारा, चंद्रपुर, वर्धा आणि अमरावती या जिल्हयांना लागुन आहे. मध्यप्रदेशातुन नागपुर शहरात येणारा प्रत्येक मार्ग नागपुर ग्रामीण जिल्हयातुन येत असल्याने अवैध रित्या जनावरे ,शस्त्र, दारू, स्फोटके, अंमली पदार्थ इत्यांदी वाहतुकी व विक्री मुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन शकतो. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी वर नमुद बेकायदेशिर कृतींना आळा घालण्यासाठी **मा श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील ११ ठिकाणी सीमा तपासणी नाके सुरू करण्यात येणार आहे.**

**पोस्टे केळवद अंतर्गत** १.केळवद ते सौंसर रोड वरील टोल नाका,२. खुर्सापार , **पोस्टे खापा अंतर्गत** ३. सिंरोजी (मध्यप्रदेश राज्य सिमा) चेक पोस्ट, **पोस्टे बोरी अंतर्गत** ४. बोरी वाय पॉईट, **पोस्टे देवलापार अंतर्गत** ५. देवलापार ते शिवणी रोड वरील मनेगाव टेक ,**पोस्टे रामटेक अंतर्गत** ६.तुमसर कडुन येणाऱ्या मार्गावर, **पोस्टे मौदा अंतर्गत** ७.बोरगाव फाटा नागपुर भंडारा रोडवर ,**पोस्टे कोंढाळी अंतर्गत** ८.खुर्सापार, **पोस्टे जलालखेडा** अंतर्गत ९.मोवाड वाय पाईन्ट जलालखेडा वरूड

कडुन येणाऱ्या मार्गावर ,**पोस्टे नरखेड अंतर्गत** १०. सावरगाव पोलीस चौकी समोर,**पोस्टे भिवापुर अंतर्गत** ११.भिवापुर पेट्रोल पंम्प जवळ चंद्रपुर कडे जाणाऱ्या मार्गावर तपासणी नाके दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पासुन सुरू करण्यात येणार असुन अधिकारी आणि अंमलदार यांची नेमणुक करण्यात आली आहे.

**<u>पोस्टे देवालापार</u>**



## पोस्टे खापा




## पोस्टे बोरी



**<u>पोस्टे मौदा</u>**

